नियमित फौ. ख. क्र.१११/२०२४
सरकार -वि.- चंद्रशेखरसिंह
नि.क्र. २३.

<u>उलट तपास आरोपीचे वकील श्री. नागोशे यांचे मार्फत</u> -

१. आरोपीला दारुचा शौक नाही. माझे लग्न दि.०७.०२.२०११ रोजी झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, मला लग्नापूर्वी दम्याचा त्रास होता. मला दम्याचा त्रास नोव्हेंबर-२०११ पासून सुरु झाला होता. मला किडनीचा त्रास होता. हे म्हणणे खरे आहे की, मला दम्याचा व किडनीचा त्रास असल्यामुळे आरोपी बऱ्याच दवाखान्यांमध्ये घेवून जात होता. हे म्हणणे खरे आहे की, मला त्रास कमी व्हावा म्हणून आरोपी बराच प्रयत्न करीत होते व आपल्याजवळून पैसे लावत होते. हे म्हणणे खरे आहे की, सन-२०१५ मध्ये माझा बराच उपचार केल्यानंतर आम्हाला मुलगा झाला. हे म्हणणे खरे आहे की, मी व आरोपी भाजीपाला विकत घेणेकरिता बरोबर जात होते. हे म्हणणे खरे आहे की, भिवापूरला राहत असताना आरोपी गावावरुन आल्यानंतर माझे व मुलासोबत बाजारात व हॉटेलात जात होते. हॉटेलचे बिल आरोपी देत होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने मला कधीही पगारा संदर्भात किंवा पैसा संदर्भात त्रास दिला नाही.

२. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने भिवापूरला राहत असताना कधीही माझ्या चारित्र्यावर संशय घेतला नाही. नागपूर येथे गोंडखैरी जवळ प्लॉट विकत घेतला होता. तो प्लॉट घेतेवेळी कर्ज घेतले होते. त्या कर्जाचा हप्ता आरोपी भरत होता. हे म्हणणे खरे आहे की, कर्जाचे हप्ते मी भरावे असे आरोपी कधीही म्हटला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीची आई व बहीण माझ्यासोबत भिवापूर येथे राहत होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या बहिणीसोबत माझा वाद झाल्यानंतर आरोपीने मला कधीही मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी मुंबईला राहत असताना मला मुलाला फिरायला घेवून जात जा असे सांगत होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा मुलाला सिवान येथे त्याच्या सोबत घेवून जायला म्हणत होता तेव्हा मी त्याला एकटे जाण्यास नाही म्हणत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलाला मी माझ्या माहेरी गुजरातला घेवून जाताना आरोपीने कधी मला मनाई केली होती. मी तरीही मुलाला घेवून जात होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला माझ्या माहेरी मुलाला घेवून जाण्यास नेहमी त्रास दिला हे मी खोटे सांगत आहे.

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी मुंबईहून ज्या ज्यावेळी या खटल्याच्या तारखेला येत होता तेव्हा माझ्या मुलाला भेटण्याकरिता फोन लावत होता. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला माझ्या मुलाला भेटण्यापासून मनाई करीत होते. साक्षीदार सांगते मी व माझा मुलगा त्यांना भेटण्यास तयार नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी मला भेटू इच्छीत होता, परंतु, मला त्याला भेटायचे नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मनात आरोपी विरुद्ध राग असल्यामुळे मला त्याला भेटायचे नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीसोबत राहायला तयार नाही. हे मी सांगू शकत नाही की, आरोपी माझ्या सोबत राहायला तयार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी मला फोन लावतो पण मी त्याच्याशी बोलत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा आरोपीवर राग असल्यामुळे मला त्याच्या सोबत राहायचे नाही. हे म्हणणे खरे आहे की, सर्व घडून सुद्ध आरोपी मला भेटण्याकरिता फोन लावतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मला फोन करण्याचा मला त्रास होतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी मुलाची शिक्षणाची फोनवरुन माहिती घेतो व त्याला शिकवितो. हे मी सांगू शकत नाही की, मुला विरुद्ध आरोपीला राग आहे किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी ज्यावेळी मुलाला भेटण्याकरिता येतो त्याला मिठाई व कपडे घेवून देतो.

४. आरोपी त्यावेळी मुलाला विचारतो की, आईची तब्बेत वगैरे कशी आहे? हे म्हणणे खरे आहे की, आरोपी मुलाला सांगतो की, त्याला त्यांच्यासोबत राहायची इच्छा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा आरोपीला त्यावेळी म्हणतो की, मम्मी नाही म्हणते. हे म्हणणे खरे आहे की, मला आरोपीशी आजही भेटायचे नाही. हे मी सांगू शकत नाही की, आरोपीला आज पण मला भेटायचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असलेली घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला आरोपी सोबत राहायचे नसल्यामुळे मी खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी आजही आरोपीसोबत जायला तयार नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक - ०७.०२.२०२६

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.